सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय
नविन मध्यवर्ती इमारत, दुसरा मजला, पुणे-४११००१
दुरध्वनी क्र. ०२०-२६१२२८४६/४७ comm.urban@gmail.com

जा.क्र.ना.बँका/1-सआ/ना.सह.बँकाकर्म.भरतीपॅनेल/मुदतवाढ2024-25/2024/2208 दिनांक : 23/07/2024

**- : कार्यालयीन आदेश :-**

**विषय : राज्यातील नागरी सहकारी बँकांमधील नोकरभरती प्रक्रीया राबविणेसाठी नियुक्त एजन्सी पॅनेलला मुदतवाढ देणेबाबत...**

**संदर्भ :** 1. महाराष्ट्र शासन, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाकडील आदेश क्रमांक युआरबी 1818/प्रक्र9/शिकाना/7-स दिनांक 21/01/2019

2. शासन पुरक पत्र क्र.युआरबी 1818/प्रक्र9/शिकाना/7-स दिनांक 29/11/2021

3. या कार्यालयाकडील आदेश जा.क्र.ना.बँका/1-सआ/ना.सह.बँका कर्म.भरती पॅनेल /1388/2022 दिनांक 14/06/2022

राज्यातील नागरी सहकारी बँकांमधील नोकरभरती प्रक्रीया ऑनलाईन पद्धतीने राबविणेबाबत शासन आदेश दिनांक 21/01/2019 अन्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या होत्या. तथापि सदर शासन आदेशान्वये करण्यात येत असलेल्या नोकर भरतीमध्ये काही अडचणी येत असल्यामुळे संदर्भ क्रमांक 2 चे शासन पुरकपत्रान्वये काही मार्गदर्शक सूचनांचा नव्याने समावेश केला आहे. सदर आदेशातील निर्देशानुसार राज्यातील नागरी सहकारी बँकांमधील नोकरभरती पक्रीया राबविणेसाठी या कार्यालयाकडून संदर्भ क्रमांक 3 चे आदेशान्वये नागरी सहकारी बँकांचे नोकर भरतीसाठीच्या एजन्सी पॅनेला मंजूरी देण्यात आलेली आहे. सदर एजन्सी पॅनेल वरील समाविष्ठ संस्थांनी त्यांचे एजन्सी पॅनेलवरील समावेशानंतरच्या कामकाजाचा आढावा या कार्यालयास सादर केला असून सदर एजन्सी पॅनेलवरील त्यांचे संस्थेच्या नावाच्या समावेशासाठी मुदतवाढ मिळावी, अशी विनंती या कार्यालयाकडे केली आहे.

त्यानुसार राज्यातील नागरी सहकारी बँकांमधील नोकरभरती करणेसाठी खालील प्रमाणे नमूद संस्थांचा नोकरभरती एजन्सी पॅनेलवरील समावेशनासाठी या कार्यालयाकडून **दिनांक 31 मार्च, 2025 पर्यंत** खालील नमूद अटी व शर्तीचे अधीन राहून मुदतवाढ देण्यात येत आहे.

1. दि महाराष्ट्र अर्बन को-ऑप.बँक्स फेडरेशन लि., 4था मजला, भारतीय क्रीडा मंदीर, नायगांव वडाळा, मुंबई 400 031
2. महाराष्ट्र स्टेट को-ऑप.बँक्स असोसिएशन लि., मुंबई शिल्पीन सेंटर, फोर्ट, मुंबई 400 032
3. पुणे जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशन लि., ऋतुरंग संकुल, अरण्येश्वर कॉर्नर, पुणे सातारा रोड, पुणे 411 037
4. सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स् को-ऑप.असोसिएशन लि., सोलापूर, 113 अ, सिद्धेश्वर पेठ, एसबीआय ट्रेझरी शाखेशेजारी, सोलापूर 413 001
5. सातारा जिल्हा नागरी सहकारी बँक्स् असोसिएशन लि., 108/10क/3, खेड, जरंडेश्वर नाका, हनुमान मंदिरा जवळ, सातारा 415 001
6. दि नाशिक जिल्हा नागरी सहकारी बँक्स् असोसिएशन मर्या., नाशिक, 4, पहिला मजला विश्वज्योती अपार्टमेंट, विश्वास बँकेचेवर, गोविंदनगर (हॉटेल प्रकाश मागे), मुंबई नाका, नाशिक 422 009



CamScanner

राज्यातील नागरी सहकारी बँकांमधील नोकरभरती प्रक्रीयेमध्ये पारदर्शकता, अनुकता व विश्वासार्हता येण्याच्या दृष्टीने उपरोक्त प्रमाणे नोकरभरती एजन्सी पॅनेलवर समावेश करण्यात आलेल्या संस्थांना खालीलप्रमाणे अटी व शर्तींचे काटेकोर पालन करणे बंधनकारक राहील-

अटी व शर्ती-

1. नागरी सहकारी बँकांच्या नोकरभरतीसाठी एजन्सीची नामतालिकेची वैधता दिनांक 31 मार्च, 2025 पर्यंत राहील.
2. नामतालिकेवर समावेशासाठी या कालावधीनंतरही प्राप्त होणाऱ्या पात्र संस्थांचा सुद्धा नामतालिकेमध्ये समावेश करता येईल. तथापि त्यांचा वैधता दिनांक ही 31 मार्च, 2025 राहील.
3. सदरची नामतालिकेची मान्यता राज्यातील नागरी सहकारी बँकांमधील केवळ कनिष्ठ लिपीक पदभरती पुरतीच मर्यादीत राहील.
4. परीक्षेच्या प्रश्नपत्रिका इंग्रजी व मराठी अशा दोन्ही (bilingual) भाषेमध्ये छापण्यात याव्यात.
5. संबंधीत परीक्षेच्या उत्तरपत्रिका भरती प्रक्रीया पूर्ण झाल्यानंतर पुढील दोन वर्ष सांभाळून ठेवण्यात याव्यात.
6. **भरती पॅनेलमध्ये समावेश करण्यात आलेल्या ज्या संस्थांना नोकरभरती प्रक्रीया राबविणेसाठी परवानगी देण्यात येत आहे, अशा संस्थांनी स्वत: सदरची पूर्ण पक्रीया राबवावयाची आहे. त्यासाठी पॅनेलवरील संस्थांना कोणत्याही बाह्ययंत्रणेची (out sourcing) मदत घेता येणार नाही. जेणेकरून भरती प्रक्रीयेची सुरक्षितता, गोपनियता व पावित्र्य (Sanctity)अबाधीत राहील.**
7. नामतालिकेवरील संस्थांचे एक वर्षातील कामगिरी (performance) पाहून त्यांना पुढील वर्षासाठी मुदतवाढ (extention) बाबत निर्णय घेता येईल.
8. सदर एजन्सीमधील संचालकांना , ते संचालक असलेल्या नागरी सहकारी बँकेत नोकर भरतीची प्रक्रिया राबविताना सदर एजन्सीची नेमणूक करता येणार नाही.
9. नोकर भरतीची प्रक्रिया राबविणाऱ्या एजन्सीमध्ये संबंधित नागरी सहकारी बँकेचे पदाधिकारी व संचालक मंडळ तसेच इतर अधिकारी / कर्मचारी अथवा त्यांचे नातेवाईक यांचे हितसंबंध गुंतलेले नसावेत.
10. सदर एजन्सीबरोबर संबंधित बँकेने गोपनियतेचा करार करणे आवश्यक राहील.
11. बँकेने सदर एजन्सीकडे काम देताना बँकेच्या संचालक मंडळाचा ठराव घ्यावा.
12. सदर एजन्सीने काम करताना त्या बँकेला आवश्यक असणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या लक्षात घेऊन व त्यांचे कार्यक्षेत्र लक्षात घेऊन स्थानिक व संपूर्ण राज्यातील एका वर्तमान पत्रात जाहिरात देणे, अर्ज मार्गविणे, छाननी करणे व परिक्षा घेणे व त्यांच्या निकालाची प्रत देणे बंधनकारक राहील.
13. सदर प्रक्रीया ही जास्तीत जास्त दोन महिन्यांच्या कालावधीत पूर्ण करणे एजन्सीला बंधनकारक राहील.
14. एजन्सीने घ्यावयाच्या परिक्षेची फी ठरविण्याचे अधिकार संबंधीत एजन्सीला राहतील. ही बाब संबंधीत बँक व एजन्सीने सामंजस्याने ठरवावी.
15. ज्या बँकेला कर्मचाऱ्यांची भरती करावयाची आहे, त्यांनी या कार्यालयाने ठरवून दिलेल्या मान्यता प्राप्त एजन्सीकडून निविदा मागवाव्यात व नंतर बँकेने त्यावर निर्णय घ्यावा.
16. सदर एजन्सीने राज्यातील नागरी सहकारी बँकांची नोकर भरती करताना शासन निर्णय दिनांक 21/1/2019 तसेच दिनांक 29/11/2021 मधील सूचनांचे काटेकोर पालन करणे आवश्यक आहे.
17. नामतालिकेवर पुढील वर्षाच्या नुतनीकरणासाठी संबंधीत एजन्सीने त्यांचे मागील एक वर्षाच्या कालावधीत केलेल्या कामकाजाच्या तपशीलासह प्रस्ताव फेब्रुवारी, 2025 मध्ये या कार्यालयास सादर करावा.



CamScanner

18. नोकर भरतीबाबत एजन्सीच्या कामकाजात गैरव्यवहार / अनियमीतता निदर्शनास आल्यास तात्काळ संबधीत एजन्सीचे नांव एजन्सी नामतालिकेवरून कमी करण्यात येईल व भविष्यात सदर एजन्सीस काळया यादीत (Black List) टाकण्यात येईल.

दिपक तावरे (भा.प्र.से.)
सहकार आयुक्त व निबंधक
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रति,

1. अध्यक्ष/ मुख्य कार्यकारी तथा सचिव, दि महाराष्ट्र अर्बन को-ऑप.बँक्स फेडरेशन लि., 4था मजला, भारतीय क्रीडा मंदीर, नायगांव वडाळा, मुंबई 400 031
2. अध्यक्ष/ मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र स्टेट को-ऑप.बँक्स असोसिएशन लि., मुंबई शिल्पीन सेंटर, फोर्ट, मुंबई 400 032
3. अध्यक्ष, पुणे जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशन लि., ऋतुरंग संकुल, अरण्येश्वर कॉर्नर, पुणे सातारा रोड, पुणे 411 037
4. अध्यक्ष, सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स् को-ऑप.असोसिएशन लि., सोलापूर, 113 अ, सिद्धेश्वर पेठ, एसबीआय ट्रेझरी शाखेशेजारी, सोलापूर 413 001
5. अध्यक्ष, सातारा जिल्हा नागरी सहकारी बँक्स् असोसिएशन लि., 108/10क/3, खेड, जरंडेश्वर नाका, हनुमान मंदिरा जवळ, सातारा 415 001
6. अध्यक्ष, दि नाशिक जिल्हा नागरी सहकारी बँक्स् असोसिएशन मर्या., नाशिक, 4, पहिला मजला विश्वज्योती अपार्टमेंट, विश्वास बँकेचेवर, गोविंदनगर (हॉटेल प्रकाश मागे), मुंबई नाका, नाशिक 422 009

**प्रत माहितीस्तव सविनय सादर -**

मा.अपर मुख्य सचिव (सहकार), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मादाम कामा रोड, मंत्रालय, मुंबई 400 032

**प्रत :**

1. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (प्रशासन), सर्व
2. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सर्व

त्यांना कळविण्यात येते की, सदर बाबत आपले अधिनस्त सर्व नागरी सहकारी बँकांचे निदर्शनास आणून देण्यात यावे.

CamScanner